## निशाणी क्र. ११५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज अपीलकार यांनी मयत उत्तरवादी यांचे वारस अभिलेखावर आणणेसाठी नि.क्र.१५,२२,२५,२८ वर पारित केलेल्या आदेशामध्ये झालेल्या कॉस्टच्या रक्कमेमध्ये बदल करून ती रक्कम कमी करणेसाठी दाखल केलेला आहे.

२. त्यांच्या म्हणण्यानुसार सदर अर्जामध्ये त्यांनी वादीने सादर केलेला दावा हा हक्कप्रस्थापना व कायमच्या ताकिदीकरिता दाखल होता व तो केवळ रू. ५१२.४० पैसे आणि न्यायालयीन मुद्रांक शुल्क रू.५०/— भरलेले आहे. त्यामुळे या न्यायालयाने पारित केलेले नि.क्र. १५,१२,२५,२८ वरील आदेश हे दाव्याच्या आकारणीच्या बाहेर जाणारे असल्यामुळे अपीलकार यांनी ते भरण्यास त्रासदायक होणार आहे. अपीलकारतर्फे अपीलकार पुरूषोत्तम परशुराम देसाई हे स्वत: आहेत. तसेच सुविज्ञ विधिज्ञ अे.आर.चव्हाण हे सुध्दा हजर आहेत. अपीलकार आणि त्यांचे सुविज्ञ विधिज्ञ यांना न्यायालयाने अशी तरतुद कोठे आहे? असल्यास ती दाखवावी असे सांगितले. परंतु, ते तशी तरतुद न्यायालयास दाखवू शकलेले नाहीत. या न्यायालयाच्या मताप्रमाणे जे आदेश पारित केलेले आहेत, ते झालेला विलंब यांचा विचार करता खूपच दयाबुध्दीने व सद्सद्विवेक बुध्दीने पारित केलेले आहेत अशा मताचे हे न्यायालय आहे.

३. अपीलकार यांनी केलेला विलंब विचारात घेता नि.क्र.१५ वरील आदेशाचा विचार करता उत्तरवादी क्र.१५ चे वारस अभिलेखावर आणणेसाठी अपीलकार यांनी सुमारे साडेपाच वर्षांचा विलंब केलेला आहे. नि.क्र.२२ वरील आदेशाचे विचार करता उत्तरवादी क्र.१९ चे वारस अभिलेखावर आणणेकरिता दिलेला आहे त्यामध्ये उत्तरवादी क्र.१९ हा दि.१९/०१/२००१ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. म्हणजे उत्तरवादी क्र.१९ चे वारस अभिलेखावर आणणेसाठी सुमारे १६ वर्षाचा विलंब झालेला दिसून येतो. तसेच नि.क्र.२५ वरील आदेशाचा विचार करता उत्तरवादी क्र.१७ चे वारस अभिलेखावर

आणणेसाठी सुमारे २२ वर्षाचा विलंब झालेला आहे. तसेच नि.क्र.२८ वरील आदेशाचा विचार करता उत्तरवादी क.२० हा कधी मयत झाला आहे आणि त्याचे वारस अभिलेखावर आणणेसाठी किती विलंब झालेला आहे ही महत्वाची माहितीच अर्जामध्ये नमूद केल्याचे दिसून येत नाही. म्हणजे सदर कामी वारस अभिलेखावर आणणेसाठी आवश्यक असलेली माहिती दिली नसल्यामुळे केवळ तांत्रिक बाबीमुळे अर्ज नामंजूर न करता न्यायालयाने तो अर्ज दयाबुध्दीने केवळ खर्चाचे आदेशाने मंजूर केलेला आहे. सबब, अशा परिस्थितीत असलेली वस्तुस्थिती आणि अपीलकार यांनी उत्तरवादी यांचे वारस अभिलेखावर आणणेसाठी केलेला विलंब यांचा विचार करता नि.क्र. १५,२२,२५,२८ वर पारित केलेले आदेश हे योग्य असल्याने त्यामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता भासत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

## — **आदेश** —

१. नि.क्र.११५ मध्ये अपीलकार याने नि.क्र. १५,२२,२५ व २८ चे अर्जावर झालेल्या आदेशातील कॉस्टच्या रक्कमेमध्ये बदल करून ती रक्कम कमी करणेबाबत केलेली विनंती नामंजूर करण्यात येते.

२. अपीलकार यांनी संबंधित अर्जामधील आदेशाप्रमाणे उत्तरवादी यांचे वारस विहीत मुदतीत अभिलेखावर घ्यावेत आणि आवश्यक ती दुरूस्ती करणेत यावी.

सही/—

(पी.आर.कदम)
जिल्हा न्यायाधीश—१
सिंधुदुर्ग —ओरोस

दि.१२/१२/२०१८